**पूर्णो संगमा यांच्या दुःखद निधनाबद्दल कृषी मंत्री एकनाथराव खडसे यांना शोक**

मुंबई, दि.४ मार्च- लोकसभेचे माजी अध्यक्ष अणि मेघालयचे माजी मुख्यमंत्री पूर्णो संगमा यांच्या निधनामुळे देश पातळीवरील एका उत्तम संसदपटुला व ज्येष्ठ राजकीय नेत्याला आपण कायमचे अंतरलो आहोत, अशा शब्दात राज्याचे कृषी मंत्री एकनाथराव खडसे यानी पी. ए. संगमा यांच्या निधाबद्दल आपल्या शोक भावना व्यक्त केल्या आहेत.

शोकसंदेशात खडसे यांनी पुढे म्हटले आहे की,१९७३ साली मेघालय युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष या पदवारून त्यांनी आपली राजकीय कारकीर्द सुरु केली. त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही.तुरा या लोकसभा मतदार संघाचे त्यांनी आठ वेळा प्रतिनिधित्व केले, यावरून त्यांची लोकप्रियता लक्षात येते.एक उत्तम संसदपटु आणि लोकसभा अध्यक्ष म्हणून त्यांची कारकीर्द कायम स्मरणात राहील. मी शोकाकुल अशा संगमा परिवाराच्या दुःखात सहभागी आहे. ईश्वर मृताच्या आत्म्यास सद्‌गती देवो, हीच ईश चरणी प्रार्थना.